




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : १६७ वा शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# त्या ६५ लाख लोकांची नावं जाहीर करा!

# आडमुठ्या निवडणूक आयोगाला सर्वोच्च धक्का

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

सर्वोच्च न्यायालयानं बिहारमध्ये सुरु असलेल्या मतदार यादीच्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिशन (एसआयआर) प्रकरणात निवडणूक आयोगाला महत्त्वाचे आदेश दिले आहेत. निवडणूक आयोगानं एसआयआरच्या अंतर्गत ६५ लाख मतदारांची नावं मतदार यादीतून वगळली होती. ही नावं आम्ही शेअर करु शकत नाही, असं आयोगानं न्यायालयाला सांगितलं होतं. पण आज न्यायालयानं निवडणूक आयोगाला या प्रकरणात महत्त्वाचे आदेश दिले आहेत. वगळण्यात आलेली ६५ लाख नावं १९ ऑगस्टपर्यंत सार्वजनिक करा, असे स्पष्ट आदेश न्यायालयाकडून देण्यात आले आहेत. आडमुठी भूमिका घेणाऱ्या निवडणूक आयोगाला हा मोठा धक्का मानला जात आहे. बिहारमध्ये एसआयआरच्या अंतर्गत ६५ लाख मतदारांची नावं मतदार यादीतून वगळली. यावरुन बराच गदारोळ झाला. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं. यावरुन आता सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला महत्त्वाचे आदेश दिले आहेत. वगळण्यात आलेली ६५ लाख नावं सार्वजनिक करा. त्या मतदारांची नावं का वगळण्यात आली, याची कारणंही सांगा, असे आदेश न्यायालयानं आयोगाला दिले आहेत. या प्रकरणातील पुढील सुनावणी २२ ऑगस्टला होणार आहे. आज झालेल्या सुनावणी दरम्यान न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांनी निवडणूक आयोगाला सुनावलं. बिहार लोकशाहीची जन्मभूमी आहे. मतदार यादीत पारदर्शकता गरजेची आहे, असं बागची म्हणाल्या. मृत, विस्थापित, एकापेक्षा अधिक नोंदणी असलेल्या मतदारांची यादी थेट संकेतस्थळावर प्रसिद्ध का केली जात नाही? यामुळे सामान्य मतदाराला दिलासा मिळेल आणि नकारात्मक भावना संपुष्टात येतील, असं न्यायमूर्ती म्हणाल्या. यावेळी निवडणूक आयोगाचे वकील राकेश द्विवेदी यांनी काही आकडेवारी सादर केली. १ एप्रिल २०२५ पर्यंत बिहारमध्ये एकूण ७.८९ कोटी मतदार होते. यातील ७.२४ कोटी लोकांनी अर्ज भरले. तर ६५ लाख नावं ड्राफ्ट लिस्टच्या




बाहेर गेली. यातील २२ लाख मृत घोषित करण्यात आले आहेत, अशी आकडेवारी द्विवेदी यांनी मांडली. ड्राफ्ट रोलमधून कोणाचंही नाव विनाकारण हटवण्यात आलेलं नाही. ज्या लोकांनी केवळ अर्ज भरले आहेत, त्यांना ऑगस्टमध्ये पुरावे, दस्तावेज सादर करावे लागतील, असं द्विवेदी यांनी न्यायालयाला सांगितलं.




# स्व. पंकज देशमुख मृत्यू प्रकरण, भाग १२

## संपादकीय लेख

विजय पोहनकर बोलतोय..! गेल्या साडेतीन महिन्यापासून हे प्रकरण संशयाने ग्रासले असून मागील अडीच महिन्यापासून न्याय हक्क जन आंदोलन समिती त्यासाठी लढा उभा करून लढत आहे. शेकडो लोकांनी प्रत्यक्ष भाग घेऊन आंदोलनाला समर्थन दिले. जळगांव जामोद शहराने कळकळीत बंद पळून आपली मूक संमती देऊन प्रकरण गंभीर आहे. हा संदेश शासनाला दिला. स्थानिक आमदार डॉ संजय कुटे ह्यांनी अधिवेशन काळात जीव तोडून या प्रकारनाची उच्च सतरीय चौकशीची मागणी केली. मात्र शासनाने त्यावर ब्र शब्द काढला नाही. उलट श्रीमती सुनीता देशमुख ह्यांनी पोलीस प्रशासनाला संशयित्यांची नांवे दिल्यावर लगेच हा घातपात नाही असे एकतर्फी प्रेस घेऊन आपल्या अंगावरील घोंगळ पोलीस प्रशासनाने अलगद फेकण्याचा प्रयत्न करून जनतेत संभ्रम निर्माण केला. त्यात ते काही अंशी यशस्वी सुद्धा झाले.मग पुढे न्याय हक्क समितीत फूट पाडण्याचा प्रयत्न झाला. आम्हाला बदनाम करण्याचा नेहमीचा डाव पुन्हा टाकला गेला. आम्ही लिखाण बंद केले म्हणजे आम्हाला पॉकेट मिळाले, हा पत्रकारावरील शिळा कढीला ऊत आणलेला प्रकार पुन्हा झालाच. त्याची आम्हाला सवय झाली आहेच. असो!पण, त्यांना माहिति नसावे खरकट्या ढुंगनातून वासच येत असतो, सुगंध नाही. जनता सुज्ञ आहे. असो! श्रीमती सुनीता पंकज देशमुख ह्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच होईल. अगदी लहान वयात न्यायसाठी कसे भांडावे, मार्गस्त कसे व्हावे हे त्यांनीच अचूक हेरलं आहे. बकरे कि माँ कब तक दुवा करेगी....... काल पासून त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे आपल्या पिल्लाना घेऊन पतीचा घातपात झाला असून त्याची चौकशी सी आय डी मार्फतच करावी म्हणून आमरण उपोषण सुरु केले आहे. आज खऱ्या अर्थाने आमची मान शरमेने झुकली. राजमाता जिजाऊ च्या मातृतीर्थ ज़िल्ह्यात एखाद्या महिलेला आपल्या नासमाज मुलांना घेऊन भर रस्त्याच्या कडेला उघड्यावर मंडप टाकून उपोषण करावे लागते. तेही अगदी शुल्लक विषयावर. लाज वाटली पाहिजे सरकारला. बरं काय बिघडणार आहे सरकारचे? जर त्यांनीच सी आय डी चौकशी लावली तर.... नक्कीच दाल काली हैं. पाच सहा वर्षाचा मुलगा, नऊ वर्षाची मुलगी ज्यांनी जीवन मृत्यू अजून समजून घेतला नाही. अशा भाबळ्या जीवांना स्वातंत्र्य दिनाच्या आंनदात देश डुबला असताना, फक्त आपल्या बापाच्या मृत्यूची चौकशी व्हावी ह्याकरिता जर मच्छरांच्या त्रासात जीव मुठीत घेऊन आंदोलन करावे लागत असेल तर.. आपल्याला छत्रपती चे नावं घेण्याची लाज वाटली पाहिजे. ज्यांचे नावं घेऊन आपण मतांची भीक मागतो आज त्या माँ साहेब जिजाऊ च्या जिल्ह्यात एक तरुणपणात विधवा झालेल्या किंवा विधवा केलेल्या महिलेवर हा प्रसंग येतोच कसा. लाज वाटली पाहिजे लाज वाटली पाहिजे. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही म्हणतात ते आजही खरेच आहे. मात्र आम्हाला संविधानावर अंतिम विश्वास आहे. एक दिवस सुनीता ताई ला नक्की न्याय मिळेल. ताई! तुमच्या जिद्दीला सलाम करतो! तुमचे नावं इतिहासत नक्की नोदित होईल. एखाद्या नवतरुण महिलेने य देशात कसे लढले पाहिजे ह्याचे जिवंत उदाहरण भविष्यात महिला घेतील. आज तुम्ही जीव धोक्यात घेऊन उघड्यावर पडलात, मात्र तो काळही येईल... तुमच्या नजरेतील आरोपी उघडे नागडे पडतील. या देशात अजून हुकूमशाही लागली नाही. मनुच्या कायद्याने हा देश चालत नाही. हा देश चालतो पूजनीय डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या संविधानाने चिंता करू नका. जनता मनातून भावनिक तुमच्या सोबत आहे. काल पासून जनता पुन्हा हळहळली, तुमच्याच संघर्षाची चर्चा आहे. महिलांमध्ये जेव्हा कुजबुज होते. तेव्हा, विषय चुली पार्यंत गेला हे समजून घ्या. फक्त मंत्रालयातील चूल कधी पेटते हेच बघायचे आहे. शेवटी न्यायलायचे दरवाजे आपल्या साठी सत्ताळ उघडे आहेत. वकिलांच्या फी साठी जनतेत जाऊ, आपल्या लढ्याला जनता साथ देईल ह्यात आम्हाला तरी शंका नाही.

# बुलढाण्यात निघाली लक्षवेधी तिरंगा रॅली!

## माजी आमदार विजयराज शिंदे म्हणाले...

## एका डोळ्यात आनंदाश्रू तर दुसऱ्या डोळ्यात दुःखाश्रू!





**जनसंचलन/बुलढाणा**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि फाळणी अत्याचार स्मृती दिनानिमित्त माजी आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षातर्फे तिरंगा रॅली काढून शहीद जवानांना आज अभिवादन करण्यात आले. एका डोळ्यात आनंदाश्रू तर दुसऱ्या डोळ्यात दुःखाचे अश्रू अशी स्थिती आहे, असे म्हणत देशाची फाळणी करणाऱ्या तत्कालीन राज्यकर्त्यांचा शिंदे यांनी निषेध नोंदविला. दरम्यान युद्ध स्मारकावर जाऊन स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या तमाम सैनिकांना माजी सैनिकांच्या साक्षीने मानवंदना देण्यात आली आहे. १४ ऑगस्ट हा दिवस फाळणी आठवणींचा दिवस म्हणून पाळला जातो, ज्यामध्ये १९४७ च्या फाळणीच्या वेदनादायक घटनांची आठवण केली जाते. या दिवशी, फाळणीच्या वेळी झालेल्या हिंसाचार, विस्थापन आणि जीवितहानीची आठवण करून, त्यातून शिकवण घेऊन भविष्यात अशी घटना पुन्हा घडू नये यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प केला जातो.फाळणीच्या वेळी झालेल्या वेदना, दुःख आणि त्यागाचे स्मरण करणे, तसेच या इतिहासातून शिकवण घेऊन भविष्यात एकता आणि शांतता प्रस्थापित करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.फाळणीच्या वेदनादायक घटनांची आठवण करून, आपण भविष्यात अशी घटना पुन्हा घडू नये यासाठी प्रयत्नशील असायला हवे, असे काही अभ्यासक म्हणतात. याच उद्देशाने भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षातर्फे विविध मार्गावरून तिरंगा रॅली काढून शहीद जवानांना अभिवादन करण्यातआलेआहे.

# पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे दि. १४ व १५ ऑगस्ट २०२५ रोजी दोन दिवसीय बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दि. १४ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व मुक्काम, दि.१५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०५ वाजती जिल्हाधिकारी कार्यालय येथे ध्वजारोहण कार्यक्रम, व नंतर महसुल भवन च्या भुमीपुजन कार्यक्रमास उपस्थिती, सकाळी १०.३० वाजता बर्दिया टाईल्स शोरुमच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती, सकाळी ११ वाजता सिंधू अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी बुलढाणा शुभारंभ कार्यक्रमास उपस्थिती, दुपारी २ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तुकाराम अंभोरे पाटील यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेटीनंतर शासकीय निवासस्थान बुलढाणा येथे राखीव, रात्री ७ वाजता अमदापुर ता.चिखली येथील डॉ. विशाल देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देणार आहेत.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com


# नाशिकमध्ये आदिवासी भवनाबाहेर मोठा गोंधळ, सरकारी निर्णयाची तिरडी बनवली, नंतर प्रेतयात्रा, नुसता गदारोळ...





**नाशिक :** नाशिकमधून मोठी बातमी समोर आली आहे. नाशिकमध्ये आदिवासी आंदोलक चांगलेच आक्रमक झाले आहेत. आदिवासी समाजाच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांकडून हे आंदोलन केलं जात आहेत. आंदोलकांचं तिरडी बांधून आंदोलन सुरु आहे. नाशिकच्या आदिवासी भवनाबाहेर शेकडो आदिवासी समाजाच्या कर्मचाऱ्यांचं आंदोलन सुरु आहे. यावेळी आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे. पोलिसांकडून आदिवासी भवन परिसरात मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात आहे. आंदोलक चांगलेच आक्रमक झालेले बघायला मिळत आहेत. शासनाने खाजगी कंपनी मार्फत भरती करण्याचा निर्णय घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. या निर्णयाच्या विरोधात सर्व आंदोलक आक्रमक झाले आहेत. या आंदोलकांचं गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलन सुरु आहे. पण आज आंदोलक चांगलेच आक्रमक झाले. आंदोलकांनी यावेळी शासनाने घेतलेल्या निर्णयाची तिरडी बनवली. या निर्णयाची होळी करण्यात आली. तसेच निर्णयाची अंतयात्रा देखील काढण्यात आली. आंदोलकांनी संध्याकाळी पाच वाजेचा अल्टीमेटम दिला होता. आपल्या मागण्यांबाबत निर्णय झाला नाही तर आदिवासी भवनात घुसून अधिकाऱ्यांना भेटू, असा इशारा आंदोलकांनी दिला. त्यानुसार आंदोलकांनी आदिवासी भवनात घुसण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी आंदोलकांना अडवलं. आंदोलकांनी आदिवासी भवनात बसून अधिकाऱ्यांना घेराव घालण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांचा प्रचंड फौजफाटा तैनात करण्यात आल्यामुळे आंदोलकांना तसं करण्यात यश आलं नाही. पोलिसांनी अधिवासी भवनाच्या चौफेर बॅरिकेट्स लावले आहेत. कुणीही आतमध्ये जाणार नाहीत, याची दक्षता घेतली जात आहे.आंदोलन करणारे बरेच आंदोलक हे आदिवासी शाळेतील आश्रम शाळांमध्ये शिक्षण किंवा इतर पदांवर कार्यरत आहेत. त्यांनी खाजगीकरणाच्या विरोधात याआधीदेखील आंदोलन केलं आहे. आंदोलकांच्या शिष्टमंडळाने मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचीदेखील भेट घेतली होती. तसेच सरकारला देखील निवेदन दिलं होतं. त्यांचं गेल्या ३० पेक्षा जास्त दिवसांपासून आंदोलन सुरु आहे. अनेक आदिवासी नेत्यांनी त्यांची भेट घेतली. त्यांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता. पण आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. आता सरकार आंदोलकांची मागणी पूर्ण करतं का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## शुभमन गिलमुळे संजू सॅमसनला बसणार सर्वात मोठा धक्का...





शुभमन गिलने इंग्लंडचा दौरा चांगलाच गाजवला. फक्त कर्णधार म्हणून नाही तर त्याने एक फलंदाज म्हणूनही नाव कमावले. या मालिकेत सर्वाधिक धावा या शुभमन गिलच्या नावावर होत्या, त्यामुळे आता आशिया कप स्पर्धेत त्याची निवड करण्यात येणार असल्याचे म्हटले जात आहे. पण शुभमन गिलच्या निवडीमुळे आता संजू सॅमसनला मोठा धक्का बसू शकतो, असे संकेत मिळत आहेत.भारताच्या कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिल आगामी आशिया कप टी-२० स्पर्धेत खेळणार असून उपकर्णधारपदाची भूमिकाही बजावण्याची शक्यता आहे.

मात्र त्याच्या येण्याने यष्टीरक्षक संजू सॅमसन याला फलंदाजीत पदावनतीस सामोरे जावे लागण्याची दाट शक्यता आहे. तसे वृत्त एका वेबासाइटने मंगळवारी दिले आहे.सॅमसन मात्र क्रमांकापेक्षा पूर्वतयारीस प्राधान्य देत असल्याचे दिसते. त्याने तिरुवनंतपुरम येथील चंद्रशेखर नायर स्टेडियममध्ये केरळ पोलिसांच्या संघासह सरावाचा श्रीगणेशा केला आहे. केरळ पोलिस दलातील खेळाडूंसह सराव करणे सोपी गोष्ट नव्हे, असा संदेशही सॅमसनने सोशल मीडियावर लिहिला आहे. गेल्या वर्षभरात सॅमसनने कारकिर्दीत बरेच चढउतार बघितले. यंदा जानेवारीत पार पडलेल्या इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत तो संघाचा पहिल्या पसंतीचा सलामीवीर होता. मात्र आशिया कपमध्ये गिलचे आगमन होत असल्यामुळे सॅमसनला त्याचा नियमीत सलामीचा क्रमांक मिळणार नाही. गिल जवळपास वर्षभराने आंतरराष्ट्रीय टी-२० खेळणार आहे. शिवाय उपकर्णधारपद लाभणार असल्याने तो आशिया कपमधील सगळ्यात सामन्यांत खेळणारे हे जवळपास निश्चित आहे. गिल याला २१ आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांचा अनुभव असून या सगळ्या लढतींमध्ये त्याने सलामीच्या फलंदाजाचीच भूमिका बजावली आहे.टी-२० संघाच्या दोनपैकी एक सलामीवीर म्हणून अभिषेक शर्मा याचे नाव निश्चित झाले आहे. सलामीवीर म्हणून १४ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सॅमसनने १८२.२०च्या स्ट्राइकरेटने ५१२ धावा फटकावल्या आहेत. एकाच मोसमात तीन शतकेही सॅमसनने भारताचा सलामीवीर म्हणूनच तडकावली आहेत. कारकिर्दीत तीनच आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांत सॅमसनने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी केली असली, तर लीग आणि देशांतर्गत टी-२०मध्ये तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याचा त्याला दांडगा अनुभव आहे. केरळच्या या गुणी क्रिकेटपटूने १३३ टी-२० डावांत तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना ४१३६ धावा फटकावल्या आहेत. ज्यात तीन शतके आणि ३१ अर्धशतकांचाही समावेश आहे.गिल आणि अभिषेक यांची नावे सलामीवीर म्हणून निश्चित झाल्यास सॅमसनला तिसरा क्रमांक मिळण्याची शक्यता अधिक आहे. कारण चौथ्या क्रमांकावर सूर्यकुमार यादव अन् मग तिलक वर्मा किंवा श्रेयस अय्यर, हार्दिक पंड्या असे फलंदाज आहेत.

## बसल्याजागी व्यायाम करून घ्या

बहुतेकजण व्यायाम करण्याचे ठरवतात; पण आळसापोटी रोज टाळत असतात. पण, आता असे करण्याचे कारण नाही. काही व्यायाम बसून सहजतेने करता येऊ शकतात.हे सोपेही आहेत व परिणामकारकही.

खांदे व मानदुखीपासून आराम : खुर्ची वा स्टुलावर आरामात बसा. दोन्ही तळहात खांद्यांवर ठेवा. या स्थितीत डावीकडे व उजवीकडे वळा.आता १ मिनीट सतत अशाप्रकारे डावीउजवीकडे वळत राहावे. नियमितपणे हा व्यायाम केल्यास खांदे व मानदुखीपासून आराम मिळतो. तसेच, ब्राउन फॅटसेल्सही सक्रिय होतात व कंबरेजवळील चरबीही कमी होते.

पोश्चर नेटका राहील : सरळ बसून पोटाखाली दोन्ही तळहात ठेवा. या स्थितीत राहात कंबरेतून प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे वळा. हा सतत १ मिनीट करीत राहा. नियमितपणे केल्यास कण्याच्या खालच्या भागात लवचिकपणा येतो व पोश्चरही नेटका राहतो.

कंबर राहील सुडौल : स्टूल वा बिनहाताच्या खुर्चीत बसावे. सरळ बसून कंबरेवर दोन्ही हात ठेवावेत. आता या स्थितीत राहत डावी-उजवीकडे वळायचे आहे. हे सतत १ मिनीट करा. नियमितपणे केल्यास कंबरेच्या आजूबाजूचे स्नायू, तर मजबूत होतीलच. शिवाय पोट व कंबरेची जादा चरबीही कमी होईल.लक्षात ठेवा की, हा करताना पाठीचा कणा एकदम ताठ ठेवायचा आहे. वाकून बसायचे नाही.

पोटाची चरबी कमी होईल : सरळ बसत आपल्या दोन्ही हातांची बोटे एकमेकांत अडकवा. आता कंबरेतून प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे वळा. वळताना हातही वळवायचे आहेत. व्यायाम सतत १ मिनीट करावा.नियमितपणे हा केल्यास पोटाजवळ साचलेली चरबी नष्ट होत असते. लक्षात ठेवा की झटयात न वळता सावकाश आरामात वळायचे आहे.

स्नायूंना मिळेल बळकटी : सरळ बसावे व दोन्ही तळहात डोयावर ठेवावेत. याच स्थितीत राहात कंबरेतून उजवीकडे व नंतर डावीकडे वळा.असे सतत ५० ते ६० सेकंद करा, या व्यायामाने बगलेतील स्नायू मजबूत होतात व खांद्याजवळील जादा चरबीही कमी होते. या व्यायाम रोज १ ते २ मिनिटे करावा.

# शहांचा उमेदवार पडला, शिंदेंचा शिलेदार विजयी

## प्रतिष्ठेच्या निवडणुकीत भाजपच्या चाणक्यांना धक्का

**नवी दिल्ली:** दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडियाच्या निवडणुकीत भाजपचे बंडखोर खासदार राजीव प्रताप रुडी यांनी पुन्हा एकदा बाजी मारली. ते सलग चौथ्यांदा क्लबच्या सचिवपदी निवडून आले. राजीव प्रताप रुडी यांच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी भाजपनं यंदा माजी खासदार संजीव बालियान यांना मैदानात उतरवलं होतं. त्यांच्या समर्थनार्थ खासदार निशिकांत दुबे उतरले होते. बालियान हे केंद्रीय मंत्री अमित शहांचे उमेदवार मानले जात होते. त्यांच्या पाठीशी महाशक्ती असतानाही रुडी यांना मिळवलेला विजय ऐतिहासिक आहे.१९४७ मध्ये स्थापन झालेल्या कॉन्स्टिट्यूशन क्लबचे सदस्य आजी, माजी खासदार आहेत.



गेल्या २५ वर्षांपासून रुडी यांचे क्लबवर वर्चस्व आहे. यंदा त्यांचा मुकाबला त्यांचेच पक्षाचे खासदार संजीव बालियान यांच्याशी होता. या निवडणुकीकडे भाजपमधील अंतर्गत संघर्ष म्हणूनही पाहिलं जात होतं. यामध्ये रुडी यांनी अमित शहांचे उमेदवार असलेल्या बालियान यांचा १०० मतांनी पराभव केला. विरोधकांची साथ मिळवत रुडी यांनी बाजी मारली.संजीव बालियान उत्तर प्रदेशच्या पश्चिम भागात असलेल्या मुझफ्फरनगरमधून येतात. ते जाट समाजाचे आहेत. तर प्रशिक्षित पायलट असलेले रुडी बिहारचे आहेत. ते राजपूत समाजातून येतात. त्यामुळे या संघर्षाला भाजप विरुद्ध भाजप सोबतच जाट विरुद्ध राजपूत अशीही किनार होती. या संघर्षात उत्तर प्रदेशच्या योगी आदित्यनाथ यांची भूमिकाही महत्वाची राहिली. अमित शहा आणि आदित्यनाथ यांचे संबंध फारसे चांगले नसल्याची चर्चा कायम होते. त्यामुळे बालियान यांच्या पराभवासाठी योगी यांनीही फिल्डींग लावली.राजपूत, जाट समाजाच्या खासदारांनी रुडी आणि त्यांच्या पॅनलसाठी मतदान केलं. विरोधी पक्षातील खासदारांची मतं मिळवण्यासाठी रुडी यांनी त्यांच्या अनेक खासदारांना तिकिट दिली. याशिवाय भाजपसह त्यांच्या मित्रपक्षांच्या खासदारांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं. त्यामुळे भाजपसह एनडीएतील पक्षांच्या खासदारांची मतंही त्यांना मिळाली. शिंदेसेनेचे खासदार श्रीरंग बारणे कार्यकारी सदस्यपदी निवडून आले. ते रुडी यांच्या पॅनेलचे उमेदवार होते.

बालियान हे अमित शहांचे उमेदवार असल्यानं विरोधी पक्षाच्या खासदारांनी रुडी यांना पाठिंबा दिला. त्यांना भरभरुन मतदान केलं. भाजप विरुद्ध भाजप असा सामना झाल्यानं भाजपची मतं फुटली. भाजपच्या अनेक खासदारांनी रुडी यांच्या बाजूनं मतदान केलं. त्यामुळे भाजपच्या चाणक्यांनी ताकद लावूनही बालियान यांचा पराभव झाला. या सगळ्यात योगी यांनीही त्यांची ताकद दाखवून दिली

# पुष्पा स्टाईलने तस्करी, टँकरमध्ये गुप्त ६ कप्पे! पोलिसांना संशय अन् गूढ उकललं, १ कोटींचा मुद्देमाल हस्तगत....

**धुळे :** स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना १२ ऑगस्टला गोपनीय माहिती मिळाली की, हरियाणाहून खाद्यतेलाच्या टँकरमधून मोठ्या प्रमाणात विदेशी दारुची तस्करी गुजरातकडे होणार आहे. या माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या देखरेखीखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि नरडाणा पोलीस ठाण्याचे संयुक्त पथक तयार करून मुंबई-आग्रा महामार्गावर आकांक्षा हॉटेलजवळ नाकाबंदी करण्यात आली.नाकाबंदीदरम्यान टाटा कंपनीचा २२ चाकी टँकर (जीजे १२, बीव्ही ५०१५) पोलिसांना दिसून आला. चालकाची ओळख मोहनलाल पुरखाराम जाट (वय २५) अशी झाली. तो राजस्थानच्या बाडमेर जिल्ह्यातील बरेवालातला गावचा रहिवासी आहे. चालकाने टँकरमध्ये खाद्यतेल असल्याचे सांगितले; मात्र संशय आल्याने पंचासमक्ष तपासणी केली असता, टँकरच्या आत लोखंडी पत्र्याने सहा गुप्त कप्पे तयार करून त्यांचे झाकण नट-बोल्ट आणि वेल्डिंगने घट्ट केलेले आढळले. ते गॅस कटरने उघडल्यावर त्यातील चार कप्प्यांमध्ये विदेशी दारु लपविल्याचे आढळले.टँकरमध्ये ४२ लाख ४८ हजार रुपये किंमतीचे २९५ बॉक्स (३,५४० बाटल्या), ८ लाख ९८ हजार ८०० रुपये किंमतीचे ७० बॉक्स (८४० बाटल्या), ४ लाख ४९ हजार ४०० रुपये किंमतीचे ३५ बॉक्स (४२० बाटल्या) आढळले. या कारवाईत एकूण ५५ लाख ९६ हजार २०० रुपये किंमतीची ४०० बॉक्समधील ३,६०० लिटर विदेशी दारु आणि ४५ लाख रुपये किंमतीचा टँकर असा १ कोटी ९६ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.संशयित चालकाने हा माल खाद्यतेल असल्याचा भास निर्माण करून, जाणूनबुजून विना परवाना विदेशी दारुची चोरटी विक्री करण्यासाठी गुजरातकडे घेऊन जात असल्याचे स्पष्ट झाले. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी



कायदा १९४९ अंतर्गत कलम ९०, ८१, ६५ (अ), ६५ (ई), ८०, ८३, १०३ सह इतर कलम ३१८ (२) नुसार नरडाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.पोलिसांनी टँकरची तपासणी केली असता, त्यांना आतमध्ये लोखंडी पत्र्यांच्या साहाय्याने सहा गुप्त कप्पे तयार केलेले आढळले. हे कप्पे नट-बोल्ट आणि वेल्डिंग करून बंद करण्यात आले होते. पंचांच्या उपस्थितीत गॅस कटरने हे कप्पे उघडले असता, चार कप्प्यांमध्ये विविध ब्रँडची विदेशी दारू लपवलेली आढळली. पोलिसांनी ५५ लाख ९६ हजार २० किमतीची विदेशी दारू आणि ४५ लाखांचा टँकर जप्त केला. आरोपी चालक मोहनलाल जाट याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याविरोधात नरडाणा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्रोहिबिशन ॲक्ट १९४९ नुसार गुन्हा दाखल करण्याचे काम बुधवारी रात्रीपर्यंत सुरू होते. ही कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे आणि अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, नरडाणाचे सहायक निरीक्षक निलेश मोरे, उपनिरीक्षक चेतन मुंडे, पोलिस अंमलदार पवन गवळी, आरीफ पठाण, देवेंद्र ठाकुर, राहुल सानप, मयुर पाटील, नरडाणाचे ललीत पाटील, रविंद्र मोराणीस, राकेश शिरसाठ, योगेश गिते यांच्या पथकाने केली.

# नांदेडमध्ये स्पा सेंटरच्या नावाने वेश्या व्यवसाय, बनावट गिऱ्हाईक पाठवला, नंतर धाड, २ युवती आणि तरुण आक्षेपार्ह अवस्थेत...

**नांदेड :** स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरु असणाऱ्या ठिकाणावर नांदेडच्या वजीराबाद पोलीसांनी छापा मारून अवैध धंद्याचा भंडाफोड केला आहे. वजीराबाद परिसरातील तरोडेकर मार्केट इमारतीतील द फ्युजन स्पा सेंटर येथे पोलिसांनी बुधवारी रात्री ही कारवाई केली. विशेष म्हणजे पोलिसांनी ५ हजार रुपये देऊन बनावट ग्राहकाच्या माध्यमातून या रॅकेटचा भंडाफोड केला. यावेळी ४ महिला आणि ३ पुरुष असे सात जणांना ताब्यात घेण्यात आले. यातील एक युवती आसाम तर इतर दोघी दिल्ली येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. या



कारवाईने परिसरात खळबळ उडाली आहे.नांदेडमध्ये अनेक ठिकाणी वैश्या व्यवसायाचा गोरखधंदा सुरु आहे. आठवडाभरापूर्वी भाग्यनगर पोलिसांनी एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याच्या स्पा सेंटरवर कारवाई केली होती. ही घटना चर्चेत असताना बुधवारी रात्री वजीराबाद भागातील तरोडकर मार्केट इमारतीतील द फ्युजन स्पा सेंटरवर पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून छापा टाकला. यावेळी दोन युवती आणि दोन ग्राहक वेगवेगळ्या रूममध्ये आक्षेपार्ह अवस्थेत पोलिसांना आढळले. शिवाय काही वस्तू देखील आढळून आल्या.पोलिसांनी स्पा सेंटरचा मॅनेजर रब दीपकसिंघ रशपालसिंघ धिल्लो, रिसेप्शनिस्ट गौरव सरपाते, विनीत कोसले, महिला रिसेप्शनिस्ट सारिका केदार यांच्यासह इतर ३ युवतींना ताब्यात घेतले. यातील एक युवती आसाम आणि इतर दोन दिल्ली राज्यातील रहिवासी आहे. कुंटनखाना चालण्यासाठी स्पा सेंटर चालकाने इमारतीतील ४ ते ५ गाळे भाड्याने घेतले होते. बाहेर राज्यातील मुली आणून मागील अनेक महिन्यांपासून या स्पा मध्ये हा गोरखधंदा सुरु होता.वजीराबाद परिसर हा मुख्य बाजारपेठ म्हणून ओळखला जातो. नागरिकांची या बाजारपेठेत नेहमी वर्दळ असते. अशा ठिकाणी हा व्यवसाय सुरु होता. महिन्याभरा पूर्वी देखील पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे या द फ्युजन स्पा सेंटरमध्ये छापा टाकला होता. मात्र तेव्हा काही आढळून आले नाही. शेवटी ५ हजार रुपये देऊन बनावट ग्राहक पाठवून वैश्या व्यवसायाचा भांडाफोड केला. वजीराबाद पोलिसांनी स्पा चालक पवितसिंघ आरतीया, पुरभाजी हरकरे यांच्यासह ६ जणांविरोधात पीटा कायद्या अंतर्गत कलम ३, ४, ५ कलमान्वे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम हे करीत आहेत.

# मंत्र्यांच्या घरी रोकडची बॅग दिसली की..., उद्धव ठाकरेंचा संजय शिरसाट यांच्यावर निशाणा

**मुंबई :** जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात महाविकास आघाडीकडून निर्धार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या मेळाव्याला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपस्थिती लावत भाषण केलं. यावेळी त्यांनी महायुतीवर सडकून टीका केली. त्यांनी जनसुरक्षा विधेयकावरुन सरकारवर निशाणा साधला. वसई विरारचे माजी महापालिका आयुक्त अनिल कुमार यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणावरुन उद्धव ठाकरे यांनी मंत्री संजय शिरसाट यांच्या व्हायरल झालेल्या एका फोटोचा उल्लेख करत निशाणा साधला. ङ्घङ्घतुम्ही स्वच्छ म्हणा, दहशतवाद किंवा देशविरोधी कायदा आहे. तर आमचा तुम्हाला पूर्णपणे पाठिंबा आहे. जो कुणी देशाच्या विरोधात कारवाई करेल त्याचा देशद्रोही हाच धर्म. त्याला फासावर लटकवा. आम्ही तुम्हाला पाठिंबा देतो. पण त्याबद्दल काहीच स्पष्टता नाहीङ्घङ्घ, असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.एकूण पाहिलं की, हे कायदा कशाप्रकारे वापरु शकतात. आज पेपरमध्ये बातमी आहे. वसई विरार महापालिकेच्या माजी आयुक्तांना अटक झाली. का? तर त्यांच्याकडे रोकड सापडली. बरोबर आहे. मग



मंत्र्यांच्या घरी रोकडची बॅग दिसली, त्यांना का अटक होत नाही? त्याला का अटक झाली नाही? त्याला समज देऊन सोडून देतात. अरे अशी बॅग उघडी टाकू नको हा. पुढच्या वेळेला बंद ठेवङ्घङ्घ, असा उपरोधिक टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला.ङ्घङ्घमला कुणीतरी विचारलं की, अहो ह्यांच्या घरातला व्हिडीओ कसा आला असेल? मी आतापर्यंत ऐकलं होतं की, भिंतीला कान असतात, पण आता भिंतीला डोळे आले.

आणखी काही दिवसांनी भिंतीला तोंड फुटलं तर मग ह्यांचं काही खरं नाही. पण हा कायदा, जे आपल्याला सांगितलं आहे की, हा तुमच्या विरोधात नाहीच. पण या कायद्यात तुम्ही जो दुजाभाव करत आहात की, इकडे रोकड सापडली तरी तुम्ही त्याला सोडून दिलंङ्घङ्घ, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.पूर्वग्रह दुषित ठेवून किंवा एखाद्या व्यक्तीला आयुष्यातून उठवायचं आहे. एक तर खोटं कांड करुन त्याला त्यामध्ये अटक करा.

त्याच्यावर असे आरोप टाका की, बेलच मिळणार नाही. न्यायालयासमोर एक-दोन वर्षांनी ती प्रकरणं येतात तेव्हा तपास यंत्रणा सांगतात की, आमच्याकडे पुरावे नाहीत. त्यांना सोडून दिले तरी चालेल. पण ह्यांच्या आयुष्यातील तीन ते चार वर्षे वाया गेली. त्याची भरपाई कोण करणार?ङ्घङ्घ, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.

## ताकद ठाकरेंची, चर्चा पालिकेची! राज ठाकरेंकडून युतीचे स्पष्ट संकेत; मनसेच्या बैठकीची इनसाईड स्टोरी



**मुंबई:** ठाकरे बंधूंच्या युतीची चर्चा सुरु असताना मनसे प्रमुख राज ठाकरेंनी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज नेते आणि पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीतून त्यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केलं. यावेळी राज यांनी केलेल्या विधानांमधून शिवसेना उबाठा आणि मनसे यांच्या युतीचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत.मुंबई महापालिकेची निवडणूक वर्षाअखेरीस किंवा पुढच्या वर्षाच्या सुरुवातीस होण्याची शक्यता आहे. त्यासाठी सगळेच पक्ष कामाला लागले आहेत. या निवडणुकीत उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती होण्याची दाट शक्यता आहे. दोन ठाकरेंमधील दुरावा कमी झाला आहे. दोघांचे पक्ष संकटात असल्यानं ठाकरेंसमोर अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर ठाकरेंचे पक्ष मुंबई महापालिका निवडणूक युतीत लढण्याची शक्यता जास्त आहेमुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंनी त्यांचे नेते आणि पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. यामध्ये राज ठाकरे ंनी केलेली दोन विधानं अतिशय महत्त्वाची आहे. मुंबईत केवळ मनसे अन् शिवसेना उबाठाच्या कार्यकर्त्यांची तळागाळात ताकद आहे. अन्य पक्षांची मुंबईत तितकीशी ताकद नाही, असं राज ठाकरे नेते आणि पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले. राज यांची मनसे विधानं युतीच्या दृष्टीनं महत्त्वाची मानली जात आहेत. या विधानांमधून राज यांनी युतीचे स्पष्ट संकेत दिल्याची चर्चा मनसेच्या गोटात आहे.गेल्या काही दिवसांपासून मतचोरीचा मुद्दा देशभरात गाजत आहे. निवडणूक आयोगानं मतचोरी करत भाजपला मदत केल्याचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. राज ठाकरेंनी हाच मुद्दा विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर उपस्थित केला होता. आता तोच धागा पकडत राज यांनी मनसेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत.

# ट्रम्प-पुतीन यांची चर्चा निष्फळ ठरली तर..; अमेरिकेची भारताला थेट धमकी; मोदी सरकार काय करणार?



**वॉशिंग्टन डीसी:** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांच्यामध्ये शुक्रवारी अलास्कामध्ये होणाऱ्या बैठकीकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलं आहे. पण आता अमेरिकेनं या भेटीचं भारत आणि टॅरिफ वॉरशी कनेक्शन जोडलं आहे. अमेरिकेचे अर्थ मंत्री स्कॉट बेसेंट यांनी ट्रम्प आणि पुतीन यांच्या भेटीआधी भारताला उघड धमकी दिली आहे. पुतीन यांच्यासोबतचा ट्रम्प यांचा संवाद निष्फळ ठरल्यास अमेरिका भारतावर अधिक टॅरिफ लादेल, असा थेट इशारा बेसेंट यांनी दिला आहे.अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांच्यात होणार्या चर्चेच्या आधारे भारतावर लादण्यात आलेल्या टॅरिफसंदर्भात पुढील निर्णय होईल. ट्रम्प आणि पुतीन यांची चर्चा निष्फळ ठरल्यास भारतावरील सेकंडरी टॅरिफ वाढू शकतो, असं बेसेंट म्हणाले. ते ब्लूमबर्गशी बोलत होते. रशियाकडून तेल खरेदी करत असल्यानं आम्ही भारतावर याआधीच सेकंडरी टॅरिफ लादला आहे. जर परिस्थिती बिघडली तर निर्बंध किंवा सेकंडरी टॅरिफ वाढवलं जाऊ शकतं, असा धमकीवजा इशारा बेसेंट यांनी दिला.या महिन्याच्या सुरुवातीला ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदीचा मुद्दा उपस्थित करत भारतावर लादण्यात आलेला टॅरिफ २५ टक्क्यांवरुन ५० टक्क्यांवर नेला. २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ दंड म्हणून लावण्यात आला आहे. हा टॅरिफ २७ ऑगस्टपासून लागू होऊ शकतो. अमेरिकेनं सर्वाधिक टॅरिफ लावलेल्या देशांच्या यादीत आता भारताचा समावेश झाला आहे.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियन तेल खरेदीवरुन भारतावर गंभीर आरोप केले आहेत. भारत रशिया कडून खनिज तेल स्वस्तात खरेदी करतो. या तेलावर प्रक्रिया करुन शुद्धीकरण झालेलं तेल भारत आंतरराष्ट्रीय बाजारात चढ्या दरानं विकून नफा कमावतो, असा आरोप ट्रम्प यांनी केला होता. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्यानं युक्रेन युद्ध सुरु असल्याचं तर्कटही त्यांनी मांडलं. भारताकडून मिळत असलेला पैसा रशिया युक्रेनविरुद्धच्या युद्धात वापरत असल्याचा दावा ट्रम्प यांच्याकडून करण्यात आला. अमेरिकेच्या आरोपांना भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानं प्रत्युत्तर दिलं. युक्रेन संघर्ष सुरु झाल्यानंतर पारंपारिक तेल पुरवठादार देशांनी युरोपला तेल पुरवठा सुरु केला. त्यामुळे भारताला रशियाकडून तेल खरेदी करण्यावाचून पर्याय नव्हता. त्यावेळी अमेरिकेनं उचलेल्या पावलांमुळे भारताला तेल खरेदीस प्रोत्साहन दिलं, अशा शब्दांत भारतानं अमेरिकेचे आरोप खोडून काढले.

# हृतिक रोशन- ज्युनियर एनटीआरचा थिएटरमध्ये धुमाकूळ, चाहते अक्षरशा: फिदा, १००० कोटी कमावणार विश्वास...



**मुंबई-** हृतिक रोशन आणि ज्युनियर एनटीआर यांचा वॉर २ हा बहूप्रतिक्षित सिनेमा अखेर रिलीज झाला आहे. अयान मुखर्जीने या सिनेमाचे दिग्दर्शन केले आहे. गेला बराच काळ या चित्रपटाबद्दल खूप चर्चा सुरू होती. सोशल मीडियावर चित्रपटाचे पुनरावलोकन येऊ लागले आहेत. चित्रपटाला प्रेक्षकांची खूप पसंती मिळत आहेत. बऱ्याच प्रेक्षकांनी हा सिनेमा १००० कोटी रुपयांचा पल्ला गाठेल असा विश्वासही व्यक्त केला आहे.एका युजरने लिहिले - वॉर २ हा चित्रपट पाहिलाच पाहिजे. खरं तर, हा चित्रपट अनेक वेळा पाहावा असा आहे. चित्रपटात सर्वकाही आहे - ॲक्शन, ड्रामा, भावना, ट्विस्ट सरप्राईज. दुसऱ्या भागात येणारे ट्विस्ट जबरदस्त आहेत. हृतिक रोशनची स्क्रीन प्रेझेन्स, ऑरा आणि त्याच्या अभिनयाची बरोबरी कोणीही करू शकत नाही.एका युजरने लिहिले - नाटू नाटू नंतरचे हे सर्वोत्तम डुएट साँग आहे. एका युजरने लिहिले - क्लायमॅक्स सीक्वेन्स, हृतिक आणि ज्युनियर एनटीआर फाईट सीक्वेन्स, दोन्ही सुपरस्टार्सची ताकद पडद्यावर चांगल्या प्रकारे दाखवण्यात आली आहे. एकाने लिहिले - हा चित्रपट एक बॉम्ब आहे. तो ब्लॉकबस्टर हिट होईल.हा एक नंबर वन चित्रपट आहे. ज्युनियर एनटीआर आणि हृतिकची एन्ट्री अप्रतिम आहे. चित्रपट उत्तम होता..... पठाण त्याच्यासमोर काहीच नाही.... १००० कोटी नक्कीच कमावेल. वॉर २ पाहिल्यानंतर मी अवाक झालो आहे. एकही कंटाळवाणा सीन नाही. पूर्ण ॲक्शन पॅक्ड चित्रपट.... मी हृतिकवरून माझी नजर हटवू शकलो नाही. चित्रपट पाहिल्यानंतर लोक अशा सर्व प्रतिक्रिया देत आहेत.

# दिलीप जोशी आणि असित मोदींमध्ये जोरदार भांडण



**मुंबई:** तारक मेहता का उल्टा चष्मा मालिकेत सगळे एकमेकांसोबत गुण्यागोविंदानं राहत असल्याचं पाहायला मिळतं. पण पडद्यामागे मात्र कलाकारांची भांडणं, एकमेकांवर आरोप, एकमेकांना त्रास देणं...अशा अनेक गोष्टी घडत असल्याचंगेल्या काही वर्षात समोर आलं आहे. गेल्या तीन-चार वर्षात अनेक कलाकारांनी ही मालिका सोडली आणि निर्मात्यांवर गंभीर आरोप केलेत.याच लोकप्रिय मालिकेतील अभिनेत्री जेनिफर मिस्त्री हिनं मालिका सोडल्यानंतर असित मोदी यांच्यावर गंभीर आरोप केले होते. तर आता तिनं दिलीप जोशी असि मोदी यांच्यातील भांडणाचा एक प्रसंगही सांगितलाय.१७ वर्षांपासून प्रेक्षकांचं मनोरंजन करणाऱ्या या मालिकेचे निर्माते असित मोदी आहेत. जेनिफर मिस्त्री, जी मिसेस रोशनच्या भूमिकेत होती, तिनं शो सोडल्यानंतर असित मोदींवर अनेक आरोप केले. हाँगकाँगमध्ये असित मोदी आणि दिलीप जोशी यांच्यात जोरदार भांडण झालं होतं, ज्यात दिलीप जोशी यांनी असित मोदींची कॉलर पकडली होती, असाही दावा जेनिफरनं एका मुलाखतीत केलाय. यापूर्वीही दोघांच्या भांडणाबद्दल बातम्या आल्या होत्या, ज्या असित मोदी यांनी खोट्या असल्याचं सांगितलं होतं, तर दिलीप जोशी यांनी या अफवा असल्याचं म्हटलं होतं. जेनिफर मिस्त्री हिनं फिल्मीज्ञानला दिलेल्या मुलाखतीत असित मोदी आणि दिलीप जोशी यांच्यातील वादावर भाष्य केलंय. जेनिफर म्हणाली की, हाँगकाँगमध्ये दिलीप आणि असित मोदींमध्ये जोरदार राडा झाला होता. सगळ्या स लोकांसमोर आरडाओरडा झाला होता. दिलीप जोशींनी असित मोदींची कॉलर पकडली होती. वातावरण तेव्हा खूपच तापलं होतं. सगळे कलाकार वैतागले होते.दरम्यान, भांडणाच्या बातम्या समोर आल्यानंतर दिलीप जोशींनी सावरासावर करण्याचा प्रयत्न केला होता. या सगळ्या अफवा असल्याचं त्यांनी म्हटलं होतं.

# आमच्या हक्काचा पिकविमा व नुकसान भरपाई मेल्यावर देता का..? रविकांत तुपकरांचा संतप्त सवाल!

## जिल्ह्यातील अडीच लाख शेतकरी पिक विम्यापासून वंचित!अतिवृष्टीचीही नुकसान भरपाई अत्यल्प.. १००% भरपाई द्या!



**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर शासनाकडून सातत्याने अन्याय होत आहे. २०२४ मधील खरीप हंगामातील २ लाख ४४ हजार २६२ एवढे शेतकरी आजही पिक विमा पासून वंचित आहेत. तसेच हुमणी अळीमुळे झालेल्या नुकसानीचे आणि मेहकर व लोणार तालुक्यात ढगफुटीमुळे झालेल्या जमिनीच्या व पिकांच्या नुकसानीची कोणतीच मदत अद्याप शेतकऱ्यांना मिळाली नाही. जी मिळाली अत्यल्प आहे.. शेतकरी प्रचंड संकटात असून आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा आहे. वारंवार शासनाकडे मागणी करूनही मदत मिळत नाही, पिक विमा आणि नुकसान भरपाईची रक्कम आता आम्ही मेल्यावर देता का? असा संतप्त सवाल शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी केला आहे. पिक विमा पासून वंचित शेतकऱ्यांना तात्काळ पिक विमा चा लाभ द्यावा तसेच हुमणी अळी व शेंडअळी मुळे झालेल्या नुकसानीची आणि अतिवृष्टीने झालेला नुकसानाची भरपाई तातडीने शेतकऱ्यांना द्यावी अशी मागणी रविकांत तुपकर यांनी केली असून या संदर्भातील निवेदन त्यांनी आज जिल्हाधिकारी यांना भेटून सादर केले. शेतकऱ्यांचा वंचित पिक विमा तसेच इतर मदतीच्या बाबतीत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी शिष्टमंडळासह आज १४ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. यावेळी रविकांत तुपकर यांनी सांगितले की, काल दि. १३ ओगस्ट रोजी बुलढाणा जिल्ह्यातील ६६०७ शेतकऱ्यांना १४ कोटींचा पिकविमा मिळाला, पण यामध्ये अनेक शेतकऱ्यांना अत्यल्प रक्कम मिळाली. ही तोकडी मदत म्हणजे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार झाला आहे. त्यातच कहर म्हणजे २०२४ मधील खरीप हंगामातील २ लाख ४४ हजार २६२ एवढे शेतकरी पिकविम्या पासून आजही वंचित आहे. अनेक ठिकाणी नुकसान होऊनही शेतकऱ्यांचे दावे रिजेक्ट केले आहेत. एकाच गट नंबर व सर्वे नंबर मध्ये शेजारी असणाऱ्या शेतकऱ्यांचे सारखे नुकसान होऊन देखील नुकसान भरपाई मात्र एकाच शेतकऱ्याला मंजूर केली जाते. व नुकसान होऊनही शेजारच्या शेतकऱ्याचा दावा अपात्र ठरविला जातो. हा विमा कंपनीचा दुष्पीपणा आहे. व दुर्दैव म्हणजे कृषी विभाग देखील कंपनीच्या या अजब कारभारात सहभागी आहे. त्यामुळे पिक विमा कंपनीवर कारवाई होणे गरजेचे झाले आहे त्यासाठी २०१४ सालापासून २०२४ पर्यंत राज्यभरात काम करणाऱ्या या कृषिविमा कंपन्यांचे टेस्ट ऑडीट झाले पाहिजे अशी आमची मागणी आहे. बुलढाणा जिल्ह्यातील पिकविम्या पासून वंचित असलेल्या जवळपास अडीच लाख शेतकऱ्यांना दुजाभाव न करता तात्काळ १०० % विमा भरपाई देण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली. तसेच हुमनी अळीने व शेंड अळीने लाखो सोयाबीन उत्पादक शेतकरी प्रचंड अडचणीत सापडले आहे. सोयाबीन पिकाची वाढ खुंटली असून उत्पादनामध्ये प्रचंड घट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हुमनी अळीने व शेंड अळीने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करतांना दुजाभाव केला जात आहे, असा अन्याय न करता वस्तुनिष्ठ पंचनामे करून १०० % नुकसान भरपाई द्यावी, दोन वेळा झालेल्या ढगफुटी सदृश पावसाने मेहकर, लोणार, सिं. राजा, चिखली तालुक्यातील शेकडो गावांमध्ये मोठ्या प्रमाणात घरातील साहित्याचे, अन्नधान्याचे, शेती पिकांचे, शेतीचे, विहिरी, पाईपलाईन, तुषारसंचांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे हे नुकसान भरपाई मिळणे देखील आवश्यक आहे. तसेच २५ व २६ जूनला झालेल्या नुकसानीपोटी खरडून गेलेल्या शेतीची जी मदत मिळाली ती अत्यल्प असून झत्याफ शेतीची पोटखराब म्हणून नोंद झाली आहे. जमीन पोटखराब असणाऱ्या शेतकऱ्यांना एकरी १८,८०० रुपये शासकीय मदत मिळणार आहे. मात्र झत्याफ शेतकऱ्यांच्या सातबारा वर पडीक जमिन म्हणून नोंद होणार आहे. पुढच्या वेळी त्या जमिनीत पीकपेरा दाखवता येणार नाही, बँकेचे पिककर्ज सुद्धा मिळणार नाही. जमिनीला पुन्हा वहीती करायचे झाल्यास लाखो रुपयाचा खर्च करावा लागणार आहे. पोट खराब वरून वहीती झाल्याची नोंद करण्यासाठीची प्रशासकीय प्रक्रिया अत्यंत किचकट आहे. त्यासाठी खूप हेलपाटे मारावे लागतात. ही प्रक्रिया अत्यंत सुलभ करावी व नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १००% नुकसान भरपाई तात्काळ द्यावी, अशी मागणी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी केली आहे. उपरोक्त मागण्यांच्या संदर्भात शासनाने गांभीर्यपूर्वक सकारात्मक विचार करावा अन्यथा अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना घेऊन आक्रमक आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल, असा इशारा देखील रविकांत तुपकरयांनीदिलाआहे.

---

## मासे, खेकड्यांची शिकार टाळा!



**जनसंचलन/बुलडाणा**

पावसाळी हंगामात जिल्ह्यातील तलाव, जलाशय आणि नद्यांमध्ये गोड्या पाण्यातील खेकड्यांचे नैसर्गिक प्रजनन मोठ्या प्रमाणावर सुरू असते. मात्र, या काळात गरोदर मादी खेकडे, अंडी व पिल्ले धारण केलेल्या माशांची शिकार होणे पर्यावरणासाठी अत्यंत हानिकारक असल्यामुळे पर्यावरणाला हातभार लावावा असे आवाहन प्रशासनाने संस्था, मच्छीमारांना केले आहे. पावसाळी हंगामात खेकडे, विशेषतः मादी खेकडे पकडणे टाळावे. अशा संवर्धनात्मक उपक्रमामुळे पुढील काळात खेकड्यांचा साठा वाढून जैवविविधतेचे संतुलन राखण्यास मदत होते. मच्छीमार बांधवांना आणि मत्स्य सहकारी संस्थांनी पुढाकार घेवून प्रजनन हंगामात नदीतील मासे व खेकडे यांच्या शिकार टाळून नैसर्गिक संवर्धनाला हातभार लावावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय यांनी आव्हान केले आहे.

## दुर्गा वाहिनी द्वारा मलकापुर पोलिस स्टेशन मध्ये रक्षा बंधन उत्सव साजरा

**जनसंचलन/मलकापुर**



रक्षाबंधन निमित्य विश्व हिन्दू परिषद दुर्गा वाहिनी मलकापूर तर्फे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना रक्षाबंधन निमित्त मलकापूर शहर पोलिस स्टेशन येथे पोहोचून राखी बांधण्यात आल्या या मागील उद्देश पोलीस प्रशासन मुळे समाजातील महिला मुली सुरक्षित आहे बहीण भावाच्या विश्वास प्रेमाचे रक्षणाचे प्रतीक आहे भावाने बहिणीला दिलेला विश्वासाचे प्रतीक म्हणजे रक्षाबंधन सर्व पोलिस बंधू यांना ही बहिणी आहेत आणि त्यांची ही खूप इच्छा असते राखी निमित्त आपल्या बहीणी कडे जायची पण आपण सर्व सामान्य व्यक्ती यांची सुरक्षा तसेच आपले सर्वांचे सर्व उत्सव शांती व आनंदी जाण्या करिता ते सणासुदीला ही दिवशी ड्युटी करावी लागते व ते आपल्या आपल्या बहिणी कडे जाऊ शकत नाही त्यांना त्यांची बहिणीची उणीव भासावी या दृष्टिकोनातून दुर्गावाहीनी हा उत्सव पोलीस बांधवांना राखी बांधून साजरा करण्यात आला जेव्हा दुर्गा यांनी पोलीसांच्या हाताला राखी बांधली त्या नंतर त्यांच्या मनात चेहऱ्यावर आनंद दिसून आला व त्यांच्या चेहऱ्या वरील हास्य तेज बघून खरोखरच सर्व दुर्गा वाहिनी भगिनींचे मन प्रसन्न झाले सर्व पोलिस बांधवांचे मन भरून आले आणि त्यांनी दुर्गावाणीच्या पदाधिकारी यांचे आभार मानले.

चौकट - रक्षाबंधन निमित्त मलकापूर शहरातील मुलींचे पाठलाग करून टॉटिंग आणि टवाळखोरी करणाऱ्या मुलांच्या बंदोबस्त करिता आपल्या पोलीस बांधवांना दामिनी पथक सुरू करण्या बाबत विनंती करण्यात आली तेव्हा त्यांनी महाराष्ट्र शासना द्वारे ११२ हा टोल फ्री क्रमांक विजय महिला साह्य करता २४ तास सुरू करण्यात आलेला आहे अशी ए.पी.आय गजाननजी कोळसे यांनी दिली.

ज्याही मुलींना असे कोणी खोडकर मुले छेडत असल्यास, पाठलाग करतात तेव्हा त्वरित ११२ या नंबर डायल करावा पाच मिनिट मध्ये पोलीस बंधू भगिनी यांच्या सहायता करता उपस्थित होतील अशी बहुमूल्य माहिती दिली आहे सर्व मुलींनी हा नंबर आपल्या फोनमध्ये सुरक्षित करून आवश्यकता पडल्यास याचा निश्चित उपयोग करावा असे आवाहन कु.पायल राजपूत दुर्गावाहिनी जिल्हा सहसंयोजिका यांनी केले

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सर्पमित्र व डॉक्टरांच्या तत्परतेने सर्प दंश झालेल्या तरुणाचे वाचले प्राण!

**जनसंचलन/ लोणार**

सर्पमित्र व डॉक्टरांच्या तत्परतेने सर्प दंश झालेल्या तरुणाचे वाचले प्राण वाचल्याची घटना १३ ऑगस्ट रोजी रायगाव येथे समोर आली.

पहाटे चार वाजून दहा मिनिटांनी रायगाव येथील मुकुंद थोरवे वय वर्ष २५ झोपेत कुस बदलत असताना, त्यांचा हात शेजारून जात असलेल्या विषारी जातीच्या नागावर पडला. दरम्यान नागाने त्याला कडकडून दंश केला व शेजारी ठेवलेल्या बॅग मागे जाऊन लपला. यावेळी मुकुंद यांचे बंधू संतोष थोरवे यांनी तत्काळ याची माहिती सर्पमित्र विनय कुलकर्णी यांना दिली. त्यावेळेस विनय कुलकर्णी पहाटे साडे तीन पासून टिटवी या गावात संतोष तनपुरे यांच्या घरी निघालेल्या नागाचा शोध घेत होते.तेथील नागाला रेस्क्यु करून पुढील दहा मिनिटांतच त्यांनी रायगाव गाठले. तेथे साडे चार फूट लांबीचा नाग आढळून आला, ज्याने मुकुंद याला दंश केला होता, त्याला रेस्क्यु करून विनय कुलकर्णी यांनी तत्काळ ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर उमेश साळवे यांना संपर्क साधून सर्प दंश झालेल्या रुग्णाला घेऊन येत असल्याचे कळविले. विष प्रतिरोधक औषधाची तयारी करून ठेवायला सांगितले आणि पुढील वीस मिनिटांतच रुग्णाला घेऊन ग्रामीण रुग्णालय लोणार येथे दाखल केले. त्यानंतर डॉ. समाधान ढाकणे व डॉ उमेश साळवे यांनी रुग्णावर उपचार सुरू केले विष प्रतिरोधक लस लावून पुढील अद्ययावत उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात रेफर केले. यात स्टाफ उर्मिला वीर, अनिता खरे, निलेश वाघ आणि किसन टेकाळे यांनी मोलाचे सहकार्य केले. सद्य स्थितीत रुग्णांची तब्येत सुधारत असून धोक्याच्या बाहेर असल्याची माहिती रुग्णाच्या नातेवाईकांनी दिली.मुख्यतः सर्पमित्र विनय कुलकर्णी यांनी केलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. पावसाळ्याच्या दिवसात सापांचे घरात शिरण्याचे तसेच सर्प दंशाचे



प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढते, कारण याच काळात सापांचे पिल्ले सुद्धा अंड्यातून बाहेर पडतात, आणि पाऊस चालू झाल्यावर साप कोरड्या जागेच्या शोधात किंवा भक्षाच्या शोधात घरात येतात, असे साप घरात न येण्यासाठी दरवाजांना कुठेही फट, सांद नाही राहिली पाहिजे याची काळजी घेणे गरजेचे आहे, तसेच जमिनीवर झोपताना मच्छरदाणी लावून झोपावे, अंधारात बाहेर जाताना हातात बॅटरी घेऊन जावे,शेतात जाताना पायात गम बूट घालून जावे असे आवाहन सर्पमित्र तसेच निसर्ग मल्टीपर्पज फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष विनय कुलकर्णी यांनी केले.

# पंतप्रधानांचा स्वच्छतेचा मुलमंत्र..इकडे नगरपालिकेचे वेगळेच तंत्र..! अत्यल्प वेतनामुळे सफाई कामगारांचे आमरण उपोषण सुरु!

**जनसंचलन/बुलढाणा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वच्छतेचा मंत्र जपत असताना बुलढाणेकरांनी केलेला कचरा उचलून स्वच्छ ठेवणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांना त्यांचे अत्यल्प वेतनही नगरपालिके कडून वेळेवर देण्यात येत नाही. त्यामुळे वेतन वाढविण्याच्या मागणीसाठी सफाई कामगारांनी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे. शिवाय संबंधित ठेकेदारांचे बिल अदा करण्यात येऊ नये अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन करू, असा इशारा अखिल भारतीय सफाई कामगार मजदूर संघटनेने दिला आहे. दिवसभर सफाईचे काम करणाऱ्या या कंत्राटी कामगारांना अत्यल्प वेतन मिळते आणि तेही वेळेवर मिळणार नसेल तर उपाशी कामगारांनी काय करायचे? असा सवाल विचारला जात आहे.सफाई कामगारांना कायद्याप्रमाणे तसेच सीएसआर दराप्रमाणे किमान वेतन अपेक्षित. आहे.परंतु नगरपालिका व ठेकेदार याकडे दुर्लक्षित आहे. त्यामुळे ५ ऑगस्टला हा प्रश्न घेऊन अखिल भारतीय मजदूर संघटनेने संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊन संबंधित ठेकेदारांचे बिल अदा करण्यात येऊ नये,असे निवेदन दिले होते.परंतु या निवेदनाला केराची टोपलीच दाखविण्यात आली. त्यामुळे सफाई कामगारांकडून १४ ऑगस्ट पासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

# ग्रामपंचायत कडून लावण्यात आलेला आरो फिल्टर तीन महिन्यात बंद.




**जनसंचलन/मलकापूर**

तालुक्यातील बेलाड येथे ग्रामपंचायत प्रशासनाकडून लाखो रुपयांचा निधी खर्च करून गावातील नागरिकांसाठी आरो फिल्टर लावण्यात आला होता. तीनच महिन्यात या आरो फिल्टर चे तीन तेरा वाजले असून लाखो रुपयांचा निधी पाण्यात गेल्याचे चित्र आहे.

या प्रकरणामुळे गावातील नागरिकांना शुद्ध पिण्याचा पाण्याचा प्रश्न अजूनही जसाच तसाच आहे..

त्यामुळे गावातील नागरिकांनी ज्या सुज्ञ युवा नेतृत्वांना संधी देऊन गाव विकासाचे पहारेकरी बनविले त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न निर्माण होताना दिसत आहे.

फक्त खादीचे कपडे घालून मिरवत बसण्यापेक्षा सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी किंबहुना सोडवण्याची जबाबदारी ही स्वीकारावी असा नाराजीचा सूर गावकऱ्यांमधून येत असल्याची माहिती आहे.

लवकरच या आरो फिल्टर बाबत ग्रामपंचायत प्रशासनाने योग्य नियोजन केले नाही तर संभाजी ब्रिगेड कडून आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाच्या माध्यमातून देणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष राहुल संबारे यांनीदिलीआहे..

# नक्षली भागात खाकीची चमकदार कामगिरी! पीएसआय सह चार अंमलदारांना विशेष सेवा पदक जाहीर!













**जनसंचलन/बुलढाणा**

राज्यातील गडचिरोली व गोंदिया भागातील नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकायदेशीर कारवायांना आळा घालण्याकरिता खडतर सेवेतील दमदार कामगिरी करणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील ४ पोलीस अधिकाऱ्यासह अंमलदार यांना विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे.मुंबईचे पोलीस महासंचालक यांच्या आदेशाने ही घोषणा करण्यात आली. सध्या स्थानिक गुन्हे शाखेतील पीएसआय म्हणून कार्यरत असलेले पीएसआय प्रतापराव बाजड यांनी मार्च २१ ते जुलै २४ दरम्यान गडचिरोली येथे नक्षलविरोधी अभियान राबवून शांतता व सुरक्षितता प्रस्थापित केली. लोकसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणूका शांततेत पार पडल्या.नक्षलग्रस्त भागातील मुला मुलींसाठी मोफत स्पर्धा प्रशिक्षण व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम पार पाडले.सदर कालावधीमध्ये ७९ मुलेमुली शासकीय सेवेत रुजू झाली. गावोगावी ग्रंथालय कार्यान्वित केली. त्यामुळे प्रतापराव बाजड यांना विशेष सेवा पदक घोषित करण्यात आले आहे.तसेच बुलढाणा शहर पोलीस स्टेशनचे पोलिस कॉन्स्टेबल रामेश्वर आंधळे, जळगाव पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल सुपाजी तायडे व सिसिटीएनएस खामगाव मध्ये कार्यरत असलेल्या महिला अंमलदार पंचगंगा भोजने यांना देखील हा सन्मान प्राप्त झाला आहे. त्यांनी नक्षलवादी विरोधी अभियान राबवून शांतता प्रस्थापित केल्याने व शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविल्याने तसेच त्यांच्या सेवेतील कार्यकाळामध्ये गोपनीय माहिती काढून वरिष्ठांपर्यंत पोहचविल्याने नक्षलग्रस्तांच्या विध्वंसक कार्यवाहीला प्रतिबंध लावता आला आहे. या कामगिरीमुळे ४ पोलीस व अंमलदार यांना विशेष सेवा पदक घोषीत करण्यातआलेआहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८